09-03-2025-Dai-01ff_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/09/2025 12:04 AM Page 1



कदंबची विमानतळावरची सेवा सुधारणे आवश्यक; वाशांनी व्हिडिओतून व्यक्त केला अनुभव पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



गुजरात जायंट्सने चौथा विजय नोंदवला पान ४ वर

वेर्णा, रविवार, ९ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 185 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 9 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार

इम्फाळ, दि. ८ : मागील काही महिन्यांपासून शांततेकडे वाटचाल करणाऱ्या मणिपूर राज्यात शनिवारी पुन्हा एकदा हिंसाचाराचे गालबोट लागले. राज्यातील वाहतूक सुरळीत करण्याच्या आदेशाची अंमलबजावणी सुरु झाली. यावेळी इम्फाळ-दिमापूर महामार्गावर कुकीसमुदायाच्या सदस्यांमध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकाचा मृत्यू झाला असून, २७ सुरक्षा कर्मचारी जखमी झाले आहे. सुरक्षा व्यवस्थेचा आढावा बैठकीवेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारपासून मणिपूरमधील सर्व रस्त्यांवर लोकांची सुरळीत वाहतूक सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले होते. आज याची अंमलबजावणी करण्याचा पहिला दिवस होता. इम्फाळहून सेनापतीकडे जाणाऱ्या वाहनांच्या ताफ्याला कुकीबहुल भागात थांबवण्यात आल्याने तणाव वाढला. सुरक्षा दलांनी हस्तक्षेप केला आणि सौम्य बळाचा वापर केला. निदर्शकांना पांगवण्यात आले आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. त्यानंतर नागरिकांच्या हालचालीसाठी मार्ग मोकळा होऊ शकला.

----------

### देशात कोट्यधीशांच्या ६ टक्क्यांनी संख्येत वाढ

नवी दिल्ली, दि. ८ : देशात कोट्यधीशांची संख्या २०२४ मध्ये वाढली असून १० मिलियन अमेरिकन डॉलरहून अधिक संपत्ती असलेल्या हिंदुस्थानींची संख्या गेल्या वर्षभरात ६ टक्क्यांनी वाढून ती ८५,६९८ इतकी झाली आहे. ग्लोबल ऍसेट कंसल्टंट नाइट फ्रँकने द वेल्थ रिपोर्ट २०२५ हा अहवाल प्रसिद्ध केला. त्यातून ही आकडेवारी समोर आली आहे. दरम्यान २०२८ पर्यंत करोडपतींची संख्या ९३,७५३ इतकी होण्याची शक्यता असल्याचेही नाइट फ्रँकने म्हटले आहे. हिंदुस्थानी अब्जापतींची एकूण संपत्ती ९५० अब्ज अमेरिकी डॉलर इतकी आहे, तर अमेरिकेतील अब्जापतींची एकूण संपत्ती ५.७ ट्रिलियन अमेरिकन डॉलर आणि चीनमधील अब्जापतींची एकूण संपत्ती १.३४ ट्रिलियन अमेरिकन डॉलर इतकी आहे. म्हणजेच हिंदुस्थान या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. हिंदुस्थानात २०२४ मध्ये अरबपतींची एकूण संख्या १९१ इतकी झाली आहे. उद्योग जगतात झालेली प्रगती आणि जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर होत आहे.

-----------

### रशियाकडून शस्त्रे खरेदीस आक्षेप

वॉशिंग्टन, दि. ८ : अमेरिकन उत्पादनांवरील आयात शुल्क कमी करण्याचा वाद अद्यापही सुरूच आहे. यातच आता अमेरिकेने हिंदुस्थानने रशियाकडून शस्त्रास्त्रे खरेदी करण्यावर आक्षेप घेतला आहे. अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक म्हणाले आहेत की, हिंदुस्थानने रशियन शस्त्रांवरील अवलंबित्व संपवावे. असे केल्याने हिंदुस्थान आणि अमेरिकेतील संबंध आणखी मजबूत होतील. हॉवर्ड लुटनिक म्हणाले की, अमेरिकन वस्तूंवर सर्वाधिक कर लावणाऱ्या देशांमध्ये हिंदुस्थानचा समावेश आहे. ते म्हणाले की, हिंदुस्थान मोठ्या प्रमाणात रशियाकडून लष्करी उपकरणे खरेदी खरेदी करतो. जे पूर्णपणे संपलं पाहिजे. तसेच हिंदुस्थान बऱ्याच काळापासून रशियाकडून पेट्रोलियम तसेच शस्त्रास्त्रे खरेदी करत आहे. पर्याय म्हणून अमेरिका हिंदुस्थानला आधुनिक शस्त्रे पुरवण्यास तयार आहे, असे ते म्हणाले आहेत.

#### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

#### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

#### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५.७७↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# गोव्यात ११.६७ कोटींचा हायड्रोफोनिक गांजा जप्त

## एकाला अटक : गुन्हे शाखेने मोठी कारवाई

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ८ : गोवा गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत आंतरराष्ट्रीय बाजारात सुमारे ११.६७ कोटी रुपये किमतीचा ११.६७२ किलो हायड्रोफोनिक गांजा जप्त केला आहे. या खास गांजाची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत प्रति किलो ५० लाख रुपये असून, हा सर्वाधिक मागणी असलेल्या अमली पदार्थांपैकी एक मानला जातो . ही कारवाई राज्याच्या अँटी-नार्कोटिक सेल पोलिसांनी दोन किलो हायड्रोफोनिक गांजा जप्त केल्यानंतर करण्यात आली. हा गुन्हे शाखेचा आतापर्यंतचा सर्वात मोठा छापा असल्याचे सांगण्यात येते.**

गुन्हे शाखेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हायड्रोफोनिक गांजा हे कोकेनचे सर्वात शुद्ध रूप आहे आणि फक्त थायलंडमध्ये पाण्याखाली लागवड केला जातो . हा रसायनमुक्त आणि थंड हवामानात टिकणारा असल्याने उच्च-प्रोफाइल व्यसनींमध्ये याला मोठी मागणी आहे. गोव्यात हा विशेष अमली पदार्थ पार्टी ठिकाणी प्रति औंस ५,००० रुपये दराने विकला जात होता. गुन्हे शाखेने गिरी येथील एका अपार्टमेंटवर छापा टाकून गौतम एम (३२) याला अटक केली आहे. तो मूळचा बेंगळुरूचा रहिवासी असून, थायलंडहून नेपाळमार्गे भारतात हायड्रोफोनिक गांजाची तस्करी करीत होता.

गौतम काही दिवसांपूर्वी बेंगळुरूहून बसने गोव्यात आला

पान २ ▶



# इस्त्रायली पर्यटकासह दोन महिलांवर बलात्कार

बंगळुरू, दि. ८ :

कर्नाटकमधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ हम्पी येथे इस्त्रायली पर्यटकासह दोन महिलांवर कथितरित्या बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तसेच, पीडित महिलांना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका तरुणाची हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून तिसऱ्या संशयिताचा शोध सुरू आहे.

हा प्रकार ६ मार्च रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडला. कोप्पल जिल्ह्यातील सानापूरजवळ दुर्गाम्मा मंदिर परिसरात रात्रीचे आकाश पाहण्यासाठी गेलेल्या पाच जणांवर तिघा आरोपींनी हल्ला केला. पीडितांमध्ये एक इस्त्रायली महिला आणि केरळमधील एका होमस्टेची केअरटेकर महिला यांचा समावेश आहे. प्राथमिक तपासानुसार, हल्लेखोर मोटारसायकलवरून घटनास्थळी आले आणि त्यांनी इंधनाविषयी विचारणा केली. त्यानंतर त्यांनी पर्यटकांकडून पैसे मागितले. नकार मिळताच त्यांनी वाद घालण्यास सुरुवात केली आणि त्यांच्यावर हल्ला चढवला. आरोपींनी तिघा पुरुषांना तुंगभद्रा नदीत ढकलून दिले. त्यातील बिभाष (२६) या तरुणाचा मृतदेह नदीत सापडला असून, तो मूळचा ओडिशाचा रहिवासी होता. पीडित केरळमधील महिलेनुसार, आरोपींनी तिच्या आणि इस्त्रायली पर्यटक महिलेच्या कपड्यांची विटंबना करत जबरदस्तीचा प्रयत्न केला. तिने दिलेल्या तक्रारीनुसार, हल्लेखोर कन्नड आणि तेलुगू भाषेत संवाद साधत होते. घटनेनंतर महिलांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी कोप्पल जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक राम एल. अरासिद्दी यांनी माहिती देताना सांगितले की, आम्ही मृतदेह तुंगभद्रा नदीतून बाहेर काढला असून, खून, बलात्कार आणि हल्ल्याचे गुन्हे दाखल केले आहेत. आरोपी कोप्पल जिल्ह्यातील गंगावती तालुक्याचे रहिवासी असून, अटक करण्यात आलेले दोघे बांधकाम क्षेत्रात काम करणारे गवंडी आहेत. तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हम्पी हे पर्यटनासाठी प्रसिद्ध असून, सुरक्षेच्या दृष्टीने ही घटना गंभीर मानली जात आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत आणि लवकरच उर्वरित आरोपींना अटक होण्याची शक्यता आहे.

# चिमुकलीच्या हत्येच्या निषेधार्थ उसगावमध्ये संतापाची लाट

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. ८ :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर, उसगावमधील महिलांनी चार वर्षीय मुलीच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ फोंडा पोलिस ठाण्यात धडक दिली. या अमानुष घटनेमुळे संपूर्ण समाजात संतापाची भावना निर्माण झाली आहे.ही घटना उसगावच्या कसयले येथे घडली असून, एका जोडप्याने मूल प्राप्तीसाठी हे क्रूर अमानुष कृत्य केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाच्या निष्पक्ष आणि सखोल चौकशीची मागणी करण्यासाठी निदर्शक महिलांनी फोंडा पोलिस निरीक्षक विजयनाथ कवळेकर यांची भेट घेतली.

स्थानिक पंचसदस्य मनीषा उसगावकर यांनी या प्रकरणाची सर्व बाजूंनी कसून चौकशी करण्याचे आवाहन करत आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. त्या म्हणाल्या, या दुर्दैवी मुलीचा या वादात काहीही संबंध नव्हता. तिला केवळ चॉकलेटचे आमिष दाखवून निर्घृण हत्या करण्यात आली. भविष्यात कोणीही असा गुन्हा करण्याचे धाडस करू नये, यासाठी दोषींना कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे.

**▶ प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करा : उसगावातील महिलांची मागणी**

या घटनेनंतर सुरुवातीला हा खून काळ्या जादूशी संबंधित असल्याचा संशय उपस्थित करण्यात आला. तथापि, पोलिसांनी घटनास्थळी धार्मिक विधींसंबंधी कोणतेही पुरावे सापडले नसल्याचे स्पष्ट केले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ही हत्या दोन कुटुंबांमधील वादातून झाली असण्याची शक्यता आहे. या संदर्भात मुलीची आई, नातेवाईक आणि अनेक रहिवासी अधिक तपशील मिळवण्यासाठी पोलिस ठाण्यात उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्त्या तारा केरकर यांनीही या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. या निर्दय हत्येमुळे कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी जलदगतीने तपास पूर्ण करून दोषींना कठोर शिक्षा द्यावी. या अमानुष कृतीसाठी केवळ जन्मठेप नव्हे, तर फाशीची शिक्षा व्हावी,असे त्यांनी सांगितले. केरकर यांनी गोव्यात यापूर्वी सीरियल किलर महानंद नाईकच्या गुन्ह्यांमुळे निर्माण झालेल्या भीतीची आठवण करून दिली आणि या घटनेने पुन्हा एकदा राज्याला हादरवून सोडल्याचे नमूद केले. तसेच, रहिवाशांनी सुरक्षेसाठी आपल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, स्थानिकांनी आरोपी जोडप्याबाबत आश्चर्य व्यक्त केले आहे. हे जोडपे प्राण्यांबद्दल अतिशय दयाळूपणा दाखवत होते. ते अनेक कुत्र्यांना चिकन आणि मटण खायला घालत आणि त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करत. अशा लोकांनी इतक्या क्रूर पद्धतीने एका निष्पाप मुलीची हत्या केली असावी, हे पचवणे कठीण आहे, असे एका स्थानिकाने सांगितले.

यापैकी आरोपी पूजा अलाट हिच्यावर स्थानिकांनी मुख्य दोष ठेवला असून, एका महिलेकडून असा अमानवी कृत्य होणे अत्यंत धक्कादायक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या घटनेने संपूर्ण उसगाव हादरले असून, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# दयानंद बांदोडकर यांनी लावलेली सुरूची झाडे तोडली जाणार

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. ८ :** गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांनी लावलेली मूळची सुरूची झाडे त्यांच्या समाधीच्या नूतनीकरणाचा भाग म्हणून मिरामार बीचवर तोडली जात आहेत. १९६३ ते १९७३ या कालावधीत मुख्यमंत्रीपद भूषवलेल्या बांदोडकर यांनी गोव्याच्या किनारपट्टीचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने उत्तरेकडील केरी बीचपासून दक्षिणेकडील गालजीबाग बीचपर्यंत सुरूची झाडे लावण्याची संकल्पना राबवली होती. वाळूच्या धूपाला आळा घालणे आणि किनारपट्टीच्या पर्यावरणीय स्थैर्याचे रक्षण करणे हा त्यांच्या या उपक्रमामागील मुख्य हेतू होता.

सुरूची झाडे केवळ पर्यावरणपूरक नव्हती, तर दिवंगत नेत्याच्या दूरदृष्टीचे प्रतीक मानली जात होती. या झाडांनी त्यांच्या समाधीला सावली आणि निसर्गरम्य पार्श्वभूमी उपलब्ध करून दिली होती. मात्र, त्यांच्या स्मारकाचे नूतनीकरण करण्याच्या प्रक्रियेत हीच झाडे तोडली जाणार असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

समाधीच्या नूतनीकरणाच्या पार्श्वभूमीवर झाडांच्या तोडीचा निर्णय विकास आणि पर्यावरणीय संतुलन यामधील विरोधाभास अधोरेखित करतो. गोव्याच्या नैसर्गिक वारशाचे संवर्धन आणि आधुनिक पायाभूत सुविधा यांच्यात संतुलन राखण्याच्या दृष्टीने हा मुद्दा अधिक गंभीर ठरत आहे.

मिरामार बीचवरील भाऊसाहेब बांदोडकर समाधीस्थळाच्या नूतनीकरणासाठी गोवा राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ कडून रू. ९.४८ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत समाधी स्थळाचे सुशोभीकरण व आधुनिकीकरण करण्याचा हेतू आहे. मात्र, स्मारकाचे सौंदर्य वाढवण्याच्या प्रक्रियेत झाडांची कत्तल होत असल्याने स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणतज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे.

स्मारकाचे नूतनीकरण सुरू असल्याने भाऊसाहेब बांदोडकर यांची वार्षिक जयंती साजरी करण्याच्या ठिकाणी बदल करण्यात आला आहे. १२ मार्च २०२५ रोजी हा कार्यक्रम मिरामार बीचवरील समाधीस्थळाऐवजी पर्वरी येथील सचिवालय संकुलात पार पडणार आहे. बांधकाम सुरू असल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

या जयंती सोहळ्यात भाऊसाहेब बांदोडकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात येईल. त्यांनी गोव्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, त्यांची दूरदृष्टी आजही राज्याच्या विकासात मार्गदर्शक ठरत आहे.

गोव्याच्या किनारपट्टीवरील निसर्गसंवर्धन आणि पर्यावरणपूरक विकासाच्या मुद्यावर या घटनेने नव्याने प्रकाश टाकला आहे. ऐतिहासिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या अशा झाडांची तोड टाळण्यासाठी स्थानिक प्रशासनाला पर्यायी उपाय शोधण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे भविष्यातील विकासकामे आणि पर्यावरणस्नेही धोरणांमध्ये अधिक समतोल राखण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होईल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# सर्वोच्च न्यायालयाचे अदानी समूहाला उत्तर देण्याचे आदेश

नवी दिल्ली, दि. ८ :



भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी अब्जाधीश गौतम अदानी यांच्या अदानी समूहाला धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेसंदर्भात स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणात दुबईस्थित सेकलिंक टेक्नॉलॉजीज कन्सोर्टियमने अदानी समूहावर जबरदस्तीने बोली जिंकण्याचा आरोप केला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी २०२३ मध्ये झालेल्या निविदा प्रक्रियेत अदानी समूहाने ६१९ दशलक्ष डॉलर्सची (सुमारे रु. ५,००० कोटी) सर्वाधिक बोली लावली होती. मात्र, सेकलिंक टेक्नॉलॉजीजने आरोप केला आहे की त्यांना या प्रक्रियेत चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आले. कंपनीने सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल करत त्यांच्या बोलीची पुनर्विचार प्रक्रिया व्हावी, अशी मागणी केली आहे.

या प्रकरणावर आधी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली होती, मात्र न्यायालयाने सेकलिंकच्या दाव्याला दुजोरा दिला नाही. त्यानंतर हा वाद थेट सर्वोच्च न्यायालयात पोहोचला. अदानी समूह आणि महाराष्ट्र सरकारने आरोप फेटाळले असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असल्याचा दावा केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने धारावी पुनर्विकास प्रकल्प तातडीने स्थगित करण्याची सेकलिंकची मागणी फेटाळली. मात्र, अदानी समूह आणि महाराष्ट्र सरकारला या प्रकरणावर उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले की, हा करार न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहील.

सेकलिंकच्या वतीने ज्येष्ठ वकील सी. आर्यमा सुंदरम यांनी न्यायालयात सांगितले की, कंपनी मूळ बोलीच्या तुलनेत २०% जास्त रक्कम देण्यास तयार आहे. मात्र, न्यायालयाने त्यासाठी लेखी निवेदन मागवले आहे. दरम्यान, अदानी समूहाचे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयात सांगितले की, प्रकल्पाचे काम आधीच सुरू झाले असून २,००० हून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. समूहाने धारावीतील रहिवाशांसाठी मोफत घरांच्या पात्रतेसाठी सर्वेक्षणही सुरू केले आहे. पुनर्विकासाच्या कामास सात वर्षांचा कालावधी लागणार असल्याचे अदानी समूहाचे म्हणणे आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्प हा मुंबईतील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या शहरी पुनर्विकास प्रकल्पांपैकी एक मानला जातो. २४० हेक्टर क्षेत्रफळावर पसरलेली ही झोपडपट्टी मुंबई विमानतळाच्या शेजारी आहे. ऑस्कर विजेत्या स्लमडॉग मिलेनियर या चित्रपटात याचे चित्रण करण्यात आले होते. आता, सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील निर्णयावर हा प्रकल्प कायम राहणार की नव्याने निविदा प्रक्रिया सुरू होणार, यावर अंतिम निर्णय अवलंबून असेल.



# भारत-न्यूझीलंडमध्ये आज महामुकाबला!

**दुबई** : क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठित स्पर्धांपैकी एक मानल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेतेपदाचा सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात उद्या रविवारी दुपारी दुबईच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळविला जाणार आहे. या सामन्याकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले असून रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघ जेतेपद पटविण्यासाठी सज्ज झाला आहे.

